ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 3 | April - 2016

Indian Streams Research Journal

# पेशवेकालीन महाराष्ट्रीय समाजातील अंधश्रद्धाळू घटनांमधील वैज्ञानिक आशय

प्रा. डॉ. संजीव सुकदेव पगारे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय,
मोराणे, ता. जि. धुळे.

## प्रास्ताविक :




महाराष्ट्रात सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून इस्लामी आक्रमक आणि सत्ताधीशांपासून महाराष्ट्रीयन मराठी समाजाचे संरक्षण केले. त्याचबरोबर मराठी भाषा, संस्कृती, चालीरीती, संत परंपरा व वारसा यांचे जतन केले. हे स्वराज्य इतर ऐतद्देशीय राज्यांबरोबरच एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत टिकून राहिले. ह्या प्रदीर्घ काळात अनेक स्थित्यंतरे घडून आलेत. ह्याच राजकीय वाटचालीस मराठा काळ म्हणून ओळखले जाते. या वाटचालीत शिवकाळात मराठाकालीन समाजात फारशा अंधश्रद्धाळू बाबींचा उल्लेख वाचावयास मिळत नाही. मात्र उत्तर मराठाकाळात म्हणजेच पेशवाईत महाराष्ट्रीय समाजात मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धाळू बाबींचा उल्लेख अनेक ग्रंथांमधून आणि कागदपत्रांमधून वाचावयास मिळतो. त्यात भूतबाधा, जादूटोणा, विविध प्रकारचे नवस, प्रायश्चित्ते, करणी, पिंडदान, तोडगा, अनुष्ठाने, शांती, दिव्य, मूठ मारणे अशा अनेक बाबींचा उल्लेख आढळतो.

वास्तविक ह्या सर्व बाबी म्हणजे अंधश्रद्धाच होत. कारण त्यांची वैज्ञानिक चिकित्सा जर केली तर त्या वैज्ञानिक निकषांवर अजिबात टिकत नाहीत, म्हणजेच सिद्ध होत नाहीत. असे असले तरी मराठाकालीन समाज ह्या बाबींना का कवटाळत होता कारण तत्कालीन समाजातील वैज्ञानिक दृष्टिकोन हा प्रगत नव्हता. प्राचीनकालीन भारतीय समाज हा वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून वाटचाल करणारा होता. म्हणून चरक, सुश्रुत, वराहमिहीर, आर्यभट्ट सारखे अनेक गणिततज्ञ व शास्त्रज्ञ, वैद्यक हे प्राचीन काळात होऊन गेलेत. शिवकालीन समाजसुद्धा वैज्ञानिक निर्देशांचा पालन करणारा समाज होता. मात्र ही परिस्थिती पुढे राहीली नाही आणि उत्तर मराठाकाळात अनेक अंधश्रद्धाळू बाबींचा स्वीकार समाजाने केल्याचे आढळून येते. अशाच बाबींचा शोध प्रस्तुत शोधनिबंधात घेऊन त्यांची वैज्ञानिक चिकित्सा करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## सतीप्रथा :

पती निधनानंतर पतीच्या चितेवर विधवेने जिवंतपणीच स्वतःला जाळून घेणे म्हणजे सती जाणे होय. सती गेल्याने त्या स्त्रीला सद्‌गती मिळते, सती जाणे म्हणजे एक पतिव्रतेचे आणि आदर्शाचे पवित्र असे

धार्मिक कृत्य मानले जाई. पती हाच परमेश्वर असतो म्हणून त्याच्याच सोबत जाऊन इहलोकांप्रमाणेच स्वर्गलोकीसुद्धा चिरंतन जीवन जगावे असे मानले जाई. तसेच स्त्री जर सती गेली तर माता, पिता आणि पती कुलांचा उद्धार होत असतो, अशी वर्णने इतिहास ग्रंथांमधून केलेली आढळतात.[1] मात्र केवळ भोळवट समजुतीमधून स्त्रिया ह्या पतीच्या चितेवर स्वतःला झोकून देत किंवा तिचे नातेवाईकच तिला तसे करायला प्रवृत्त करीत. या प्रथेचा जर वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार केला तर सतीची पद्धत म्हणजे धार्मिक श्रद्धेचा उज्वल अविष्कार नसून स्त्रियांच्या निर्घृण खूनांना मान्यता देणारी अशी क्रूर प्रथाच होती. म्हणूनच आद्य समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांनी सती विरोधात प्रबोधन करून ब्रिटिश सरकारला सन 1829 मध्ये सतीबंदीचा कायदा करण्यास भाग पाडले.[2] यामागे मनुस्मृतिसारख्या धर्मग्रंथांचाही समाजजीवनावर मोठा प्रभाव असल्याचे दिसते. म्हणूनच स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्या अशा धर्मग्रंथांची होळी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री मुक्तीची दालने खुली केलीत.

## प्रायश्चित्ते :

आपल्या हातून कळत–नकळत काही पाप घडल्यास त्यापासून मुक्तता मिळण्याकरिता प्रायश्चित्ते दिली जात. जातीनिषिद्ध कर्म ब्रह्महत्त्या, बदकर्म, चोरी, व्यभिचार सारख्या वर्तनामुळे माणसाच्या हातून पाप घडले असता प्रायश्चित्ते सांगितली जात. शुद्धीकरणासाठी धर्मशास्त्राप्रमाणे अशावेळी त्र्यंबकेश्वर, गंगानदी, कृष्णानदी अशा ठिकाणी जाऊन प्रायश्चित्ते करावी लागत. अशी कृत्ये सामाजिक गुन्हे समजून त्यातून मुक्ती मिळविण्याकरता तीर्थस्थळी जावून शुद्धीकरण करावे लागत असे. म्हणजेच जातीची चौकट कायम राहावी म्हणून कोणीही जातीनिषिद्ध कार्य करू नये, ब्राह्मणाची कोणीही हत्या करू नये, असा उद्देश यामागे होता. म्हणजेच तो काळ धर्मांध आणि जातीयवादाने बरबटलेला होता. ब्राह्मणवर्गाचेच समाजावर वर्चस्व राहवे म्हणून अनेक कर्मकांडे समाजावर लादण्यात आली होती. ही व्यवस्था राहावी याकरिता या सर्व बाबी समाजमनामध्ये बिंबवण्यात आल्या होत्या.

एखाद्याकडून ब्राह्मणाची हत्या झाली तर ती ब्रह्महत्या समजून प्रायश्चित्त घ्यावे लागत होते. यात प्रायश्चित्त होण्यापूर्वी व नंतर ब्राह्मण भोजनाचा संकल्प सोडावा लागत असे. पुण्यात नाना फडणवीस या पेशव्यांच्या मुख्य कारभारीच्या कारकीर्दीत घाशीराम कोतवाल (पुण्याचा पोलीस अधिकारी) याने पुण्यातील काही ब्राह्मणांना चोरी करण्याच्या आरोपावरून कैदेत टाकले होते. त्यात एकवीस ब्राह्मणांचा कैदेतच मृत्यु झाला होता. त्यांच्या मृत्यूस घाशीराम कोतवाल यास जबाबदार धरण्यात येऊन त्यास प्रायश्चित्त देण्यात आले होते. त्याकरिता घाशीराम कोतवालाचे पारिपत्य करण्याचे ठरविण्यात आले. याकरिता त्यास तुरुंगात डांबण्यात आले. पुढे पुणे शहराच्या बाहेर नेऊन त्यास ब्राह्मणांनी सामुहिकपणे दगडधोंड्यांचा मार देऊन ठार केले. सदर प्रकार क्रूर असे कृत्य असल्याने 10 हजार ब्राह्यणांना भोजनदान देवून शांती करण्यात आली होती.[2] असे असले तरी ब्राह्मण व्यक्तीकडून ब्राह्मणाची हत्या झाल्यास त्यास सौम्य प्रायश्चित्त दिले जाई. हत्या करणाऱ्याला भिक्षा देण्यात आली असली तरी शिक्षेनंतर ती व्यक्ती दोषमुक्त होत होती, असे मात्र नव्हे. त्याकरिता सामाजिक प्रायश्चित्त करुन घेणे बंधनकारक होते.

एखाद्या स्त्रीने बदकर्म केले किंवा एखाद्या स्त्रीशी काही व्यक्तींनी बदकर्म केल्यास अशा व्यक्तींना ब्रह्मगिरी पर्वतास प्रदक्षिणा मारणे, वाळीत टाकणे, सामाजिक व वैवाहिक बहिष्कार टाकणे, दिव्य करणे अशी प्रायश्चित्ते दिली जात होती. असे असले तरी पेशवेकालीन समाजव्यवस्था ही जातीयवादी असल्याने प्रायश्चित्ताचा पाया मुख्यत्वे जाती श्रेष्ठत्वाचा अहंकार असाच राहिला होता. प्रायश्चित्त देण्यामागील उद्देश न्याय्य तसेच वैज्ञानिक राहात नसे. एखाद्या कनिष्ठ वर्गातील स्त्रीशी सवर्ण वर्गातील व्यक्तीने बदअमल केला असता अत्याचारित स्त्रीविषयी न्याय्य व मानवतावादी बाजुंचा विचार सहसा केला जात नसे. उलट सवर्ण पुरुषाने कनिष्ठवर्गीय स्त्रीशी बदअलम केला म्हणून त्या सवर्ण पुरुषांना शुद्ध होण्याचे प्रायश्चित्त सांगितले जाई. थोरल्या बाजीराव पेशवे यांचे काळात पुरंदर येथील गंगाजी जगताप व त्यांच्या इतर सहा साथीदारांनी अस्पृश्य स्त्रीशी बदअमल केला असता त्यांना वाराणसी येथे पाठवण्यात आले. तसेच ज्ञातीसभेसमोर त्यांची शुद्धी करण्यात आली. त्यांच्या गोत्रजांसह मुंडन करून तीन दिवसांच्या उपोषणाचे प्रायश्चित्त देण्यात आले.

एवढ्यावरच हे सर्व थांबविण्यात आले नाही तर त्या सात व्यक्तींकरवी गावकऱ्यांनाही संसर्ग झाला असल्यामुळे दोष लावून एक दिवस उपवास करण्याचे प्रायश्चित्त देण्यात आले होते.[3]

## बळी प्रथा :

पूर्वी महाराष्ट्रीय समाजजीवनात ग्रामदेवतांना प्रसन्न करण्याकरिता प्राण्यांचा बळी देण्याच्या प्रथा–परंपरा होत्या. प्रसंगी नवस बोलून तो फेडला जात असे. ग्रामदेवता ह्या गावाचे संरक्षण करतात, त्यांना पुजल्याने किंवा बळी देवून संतुष्ट केल्याने गावातील अरिष्टाचे विमोचन होते, असे मानले जाई. आजच्या विज्ञानयुगात ही निव्वळ अंधश्रद्धाच ठरली असली तरी आजही ह्या बाबी समाजात खोलवर रुजून बसल्याचे आढळते. दसरा सणाच्या दिवशी गावाच्या वेशीवर बकरा किंवा रेड्याचा बळी देऊन ग्रामदेवतांना संतुष्ट केले जात होते. बळी देण्याचीही प्रथा सर्वच जाती–जमातीतील लोकांमध्ये होती. अनेक जाती–जमातीतील लोक वेगवेगळ्या बाबींच्या साध्याकरिता आपापल्या ग्रामदेवतांना बळी देण्याचा नवस मानून तो फेडत असत. महाराष्ट्रातील खानदेश परगण्यातील भिल्ल आदिवासी लोकांची देवमोगरा ही आराध्य देवता असून मोठी यात्रा भरवली जात असे. आजही या देवतेची यात्रा भरते. यात्रेप्रसंगी भिल्ल लोक देवमोगरा देवतेला पशूबळी देऊन आपल्या सुखसमृद्धीची मागणी करत असतात. आपल्या गावावर एखादे नैसर्गिक आरिष्ट आले असता त्याच्या निवारणार्थ ग्रामप्रमुख हा देवमोगरा देवतेला पशूबळीचा नवस करून तो फेडीत असत.[4] वास्तविक पशूबळी देणे ही प्रथाच क्रूर होती. गावावर येणाऱ्या नैसर्गिक आरिष्टांमागील शास्त्रीय कार्यकारणभाव शोधून त्यांच्या निवारणार्थ उपाययोजना करणे हा विवेकीपणा तत्कालीन समाजात नव्हता. येणाऱ्या रोगराई, पर्जन्य, अतिवृष्टी, साथीचे रोग यांची कारणमीमांसाच वैज्ञानिक दृष्टीने समाज करीत नव्हता. म्हणूनच अशा अवैज्ञानिक बाबींना सर्वच जाती–जमातीतील लोक कवटाळत होते.

## दृष्ट काढणे :

दृष्ट किंवा नजर लागणे ही अंधश्रद्धा तत्कालीन समाजात जोपासली जात होती. एखाद्याची नजर वाईट असते. त्याच्या दृष्टीस पडल्याने वाईट होते. अशी समजूत तत्कालीन समाजाची होती. म्हणून जर काही शारीरिक त्रास झाला तर कोणाची तरी किंवा एखाद्या माणसाची/स्त्रीची नजर लागली, अशी समजूत करून घेत आणि त्याच्या निवारणार्थ लागलेली दृष्ट किंवा नजर काढली जात असे. याकरिता आजारी व्यक्तीवरून मीठ–मिरच्या ओवाळून टाकल्या जात. दृष्ट काढली म्हणजे जडलेल्या शारीरिक व्याधीतून मनुष्य मुक्त होत असे. राजेरजवाडेही दहीभाताच्या पाट्या ओवाळून टाकण्याचे तोडगे करून दृष्ट किंवा नजर उतरवीत असत. पेशवेकालीन समाजात वज्रावळ मण्यांची माळ बनविण्यात आलेली असे. ज्या व्यक्तीला दृष्ट लागून किंवा नजर लागून अनारोग्य लाभले असेल त्याच्या गळ्यात ती माळ घालण्यात येत असे.[5]

## मृत व्यक्तीचे दहावे :

हिंदू धर्माच्या प्रथा–परंपरानुसार मृत व्यक्तीचे दहावे केले जाई. त्यालाच दशापिंडी विधी असे म्हटले जाते. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर दहाव्या दिवशी तिलांजली देण्याचा धार्मिक विधी केला जाई. तिलांजली देण्याआधी मात्र त्याच्या पिंडास कावळ्याने येऊन शिवणे किंवा स्पर्श करणे आवश्यक मानले जाई. यात मृत व्यक्तीचे आवडते पदार्थ बनवून ते पत्रावळीवर ठेवले जात. या पदार्थांना कावळा शिवला तर मृत्यू पावलेली व्यक्ती ही अतिशय नशीबवान होती, असे मानले जाई आणि समजा जर का मृत्युपिंडास कावळा स्पर्श करीत नसेल किंवा चोच मारून शिवत नसेल तर मृताचा जीव घुटमळत असल्याचे मानले जाई. नातेवाईक पत्रावळीपासून लांब जाऊन बसत एवढेच नव्हे तर काव–काव करून कावळ्याला बोलवित असे करूनही कावळा आलाच नाही तर दर्भाचा कावळा बनवून सदर दशपिंडी विधी पार पाडला जाई. अशीच एक घटना सन 1800 मध्ये कोल्हापूर राज्यात बाबा महाराजांच्या दशपिंडी विधीबाबत घडल्याचे वाचावयास मिळते.

वास्तविक मृतात्म्यास शांती लाभावी म्हणून करण्यात येणारा दशपिंडी विधी आणि त्या अनुषंगाने पिंडीस जर कावळा शिवला तर मृतव्यक्ती नशीबवान होती, कावळा शिवला नाही तर मृत व्यक्ती पापी होती

किंवा अतृप्त आत्म्याच्या पिंडास कावळा शिवत नसतो म्हणून मध्य व इतर अनेक पदार्थ पिंडीत ठेवले जात. ही प्रथा तत्कालीन समाज श्रद्धा म्हणून पाळत असला तरी ती निखळ अंधश्रद्धाच होती. कारण जिवंत व्यक्ती खाते–पिते तेंव्हा त्यास आवडणारे पदार्थ दिल्यास ती संतुष्ट होणे स्वाभाविक आहे. अर्थात खरी गरज तेव्हाच असते मात्र तेव्हा खरे तर हेटाळणीपूर्वक वागणूक दिली जाते आणि मेल्यावर मात्र श्रद्धापूर्वक विधिवत हा सर्व आचार करणे म्हणजे अंधश्रद्धाच होय आणि आश्चर्य म्हणजे त्या व्यक्तीचे चांगले–वाईट चारित्र्य कावळा ह्या पक्षावर अवलंबून ठेवले जात असेल तर माणसाला स्वतःला बुद्धिवादी समजण्याचा अधिकार काय? असा प्रश्न उपस्थित होतो.

## देवीचा तोडगा :

पेशवेकालीन महाराष्ट्रीय समाजात आरोग्य लाभण्याकरिता अनेक प्रकारचे तोडगे वैद्य लोकांकडून करून घेतले जात. तत्कालीन समाजात देवीचा रोग हा सुद्धा जंतूचा प्रताप नव्हे तर देव–देवतांचा प्रकोप मानला जात असे. त्याकरिता देव–देवतांना संतुष्ट करण्यासाठी नवस–सायास केले जात. या रोगाच्या निवारणार्थ प्रसंगी वेगवेगळ्या प्रकारचे तोडगेही करण्यात येत. शक्तीचे प्रतीक असलेल्या देवींचे वाहन हे वाघ हा सामर्थ्यशाली प्राणी मानला जाई. वाघाचे मांस जर देवी झालेल्या रोग्याच्या अंगावरून ओवाळून टाकल्यास देवी संतुष्ट होईल आणि आजार बरा होईल अशा श्रद्धेतून असे तोडगे केले जातण मराठाकालीन विशेषतः पेशवेकालीन महाराष्ट्रीयन समाजात कमालीच्या अंधश्रद्धाळू बाबींची जपणूक केली जाई. कारण पाश्चात्य जगतात देवीच्या आजारावर लस टोचून घेणे या आजारावर उपाय होत असता महाराष्ट्रीयन समाजात मात्र तोडगेच प्रचलित होते. यात आश्चर्य म्हणजे महाराष्ट्रीय समाजात लस टोचून घेऊन देवीच्या आजारावर उपाय योजिले जात असले तरी या लस टोचून घेण्यासही देवी काढण्याचा तोडगा असे संबोधले गेले. अशा अनेक अंधश्रद्धाळू बाबी आपल्या समाजात जोपासल्या जात होत्या.

## सारांश / निष्कर्ष :

पेशवेकालीन महाराष्ट्रातील समाज हा भेदग्रस्त होता. सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात माणसामाणसांत भेद केला जात असे. मानवनिर्मित प्रथा–परंपरांनी तर उच्छाद मांडला होता. धार्मिक क्षेत्रात असलेल्या अनिष्ठ रूढींनीतर स्त्रीया आणि निम्न जातीयांवर अनेक निर्बंध लादून त्यांचे जीवन पशूवत बनवून टाकले होते. प्राचीनकालीन उज्वल परंपरांचा या काळात लोप पावला होता. सतीसारख्या क्रूर आणि रानटी प्रथांना उज्वल धार्मिक श्रद्धेचा अविष्कार समजून स्त्रियांचे निर्घृण खूनच केले जात. कळत–नकळत घडणाऱ्या घटनांना पाप–पुण्याची जोड देऊन प्रायचित्ते करायला लावली जात. विविध देवदेवतांच्या प्रकोपातून मुक्त होण्यासाठी पशू–पक्षांचा बळी दिला जात असे. कोणा एखाद्या पुरुषाची किंवा स्त्रीची नजर वाईट असते म्हणून आलेल्या अनारोग्यातून मुक्त होण्याकरिता दृष्ट काढणे सारखे प्रकार समाजात जोपासले जात होते. मृत व्यक्तीच्या पिंडाला कावळा शिवणे हे शुभ मानले जात असल्यामुळे त्याच्याकरिता अनेक अंधश्रद्धाळू प्रकार समाजात रूढ होते. आजारातून बरे होण्याकरिता अनेक तोडगे केले जात. या सर्व बाबी तत्कालीन समाजाला सामाजिक आणि धार्मिक श्रद्धेचे उज्वल अविष्कार वाटत असले तरी त्यांचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून मूल्यमापन केल्यास त्या सर्व बाबी म्हणजे निव्वळ अंधश्रद्धाच होत्या. अशाच निष्कर्षाप्रत आपणास येण्याशिवाय पर्याय राहत नाही.

## संदर्भ :

1. भट यशवंत आबाजी (अनु.), ***धर्मशास्त्राचा इतिहास***, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई पृ. 249.
2. कठारे डॉ. अनिल, ***शिवकाळ व पेशवाईतील महारांचा इतिहास***, कल्पना प्रकाशन, नांदेड, 2001 पृ. 14.

3. बैसाने डॉ. अनिल, पाटील डॉ. सुभाष, ***मराठाकालीन महाराष्ट्रातील समाजजीवन आणि अंधश्रद्धा,*** सम्यक्ता प्रकाशन, धुळे, 2017, पृ. 59–60.
4. जोशी पं. महादेव शास्त्री, (संपा.), ***भारतीय संस्कृतीकोश, खंड–6,*** भारतीय संस्कृती मंडळ, पुणे, पृ. 534.
5. चाफेकर ना. गो., ***पेशवाईच्या सावलीत***, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे पुरस्कृत ग्रंथमाला क्रमांक–34, 1959, पृ. 181.
6. मोडक बाळाजी प्रभाकर (संपा.), ***कोल्हापूर कर्नाटक प्रांताचा इतिहास उत्तरार्ध,*** भाग–1, पृ. 129.
7. भावे वा. कृ., ***पेशवेकालीन महाराष्ट्र***, भारतीय अनुसंधान परिषद, दिल्ली, 1976, पृ. 103.



**प्रा. डॉ. संजीव सुकदेव पगारे**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे, ता. जि. धुळे.**